जा.क्र. ११९५/२०२०  मोट

# – प्रेस नोट–

दि. ३०/०३/२०२१

| विभाग | अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | दिपक चिंतू केतकर, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोटकामते, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग. (वर्ग–३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ८,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ८,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे वडीलांनी प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल मंजुर होणकरीता ग्रामपंचायत कोटकामते येथे अर्ज दिलेला होता. त्याप्रमाणे घरकुल मंजुर होवुन त्यांच्या बॅक खात्यामध्ये सदर योजनेचा पहीला हप्ता रू. १५,०००/– दुसरा हप्ता रू. ४५,०००/– जमा झालेले आहेत. तिसरा हप्ता रू. ४०,०००/– मंजुर करून घेणेकरीता यातील आरोपी लोकसेवक केतकर यांनी तक्रारदार यांचेकडे ८०००/– रू. ची मागणी केली. तक्रारदार यांना लोकसेवक केतकर यांना लाच दयावयाची नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेकडे दि. २४/०३/२०२१ रोजी तक्रार दिलेली होती.<br>तक्रारीच्या अनुषंगाने सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून दिनांक २५/०३/२०२१ रोजी दोन शासकिय पंचांसमक्ष पडताळणी करण्यात आली. दि. २५/०३/२०२१ रोजी लोकसेवक केतकर यांनी तक्रारदार यांचेकडे ८,०००/– रू. लाचेची मागणी करून सदरची लाच रक्कम दि. ३०/०३/२०२१ रोजी घेवनू येण्यास सांगितल्याने लोकसेवक यांचेविरोधात ग्रामपंचायत कोटकामते परिसरात सापळा आजमावीला असता लोकसेवक केतकर यांना तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम रुपये ८,०००/– स्विकारले स्थितीत मिळुन आल्याने त्यांना दिनांक ३०/०३/२०१९ रोजी १४.५७ वा. रंगेहाथ पकडण्यात आले.<br>वरील कारवाई श्री. दिपक कांबळे, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि. सिंधुदुर्ग, पोनि/केणी, पोनि/कुंभार, लाप्रवि सिंधुदूर्ग, यांचे मार्गदर्शनाखाली सपोउनि श्री.फाले, पोहवा/रेवंडकर, पोतनीस, परब, पोना/पेडणेकर, पोकॉ/ खंडे, मपोना/प्रभु यांचेकडून करण्यात आलेली आहे. |

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :– अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग यांचे कार्यालय, कुडाळ,ता.कुडाळ
टोल फ्री नंबर:–१०६४,
दुरध्वनी क्र.०२३६२–२२२२८९

(दिपक कांबळे)
पोलीस उपअधीक्षक
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग